Exh.01

# अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब, यांचे कोर्टात

**एस. सी. सी. नं.**

3440 /२०२५

**फिर्यादी**

**मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि.**
**मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर**
शाखा- राहुरी, अहमदनगर.
तर्फे व करीता अधिकृत प्रतिनिधी
श्री. सागर लक्ष्मण फुलारी
वय - ३० वर्षे, धंदा- नोकरी, रा. अहमदनगर
मो.नं. ९८९०३६७२३७.

**आरोपी**

**भिमाबाई सुभाष वाकचौरे**
वय-82वर्ष, धंदा- व्यावसाय,
रा. मु.पो. खेडले परमानंद
ता. नेवासा, जि.अहमदनगर.
मो.नं. 9657631214

**फिर्याद - निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे**

**याकामी फिर्यादी नम्रपूर्वक कळवितो ते येणेप्रमाणे**

| | |
|---|---|
| १. चेक देणाराचे | भिमाबाई सुभाष वाकचौरे |
| २. चेक कोणत्या बँकेचा | एच डी एफ सी बँक, शाखा – सोनई, अहमदनगर . |
| ३. चेक नंबर व तारीख व रुपये | ००००0१, ता. ०६/०१/२०२५ रु. ४४,८००/- |
| ४. चेक भरल्याची तारीख- | ०८/०१/२०२५ |
| ५. चेक परत आल्याची तारीख- | ०९/०१/२०२५ |
| ६. चेक परत आल्याचे कारण - | "फंड्स इनसफीशीएंट" |
| ७. नोटीस पाठविल्याची तारीख - | २७/०१/२०२५ |
| ८ .नोटीस स्विकारली तारीख- | 09 /०२/२०२५ |

९. गुन्हा घडले कारण- ता. ०९/०१/२०२५ रोजी चेक परत आला त्यावेळी घडले,तदनंतर नोटीस पाठवून आरोपीने स्विकारली मात्र मुदतीत चेकची रक्कम आणून दिली नाही त्यावेळी घडले.

१०. कोणत्या पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हा घडला- तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर.

१. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर, शाखा- राहुरी, अहमदनगर ही संस्था मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ अन्वये स्थापन झालेली सहकारी संस्था आहे. सदर संस्थेचे मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर, येथे असुन इतर ठिकाणी शाखा आहे. फिर्यादी संस्थेचा कारभार सदरच्या कायद्यानुसार तसेच फिर्यादी संस्थेचे पोटनियमानुसार चालतो. फिर्यादी संस्थेच्या वतीने नोटीस पाठवणे फिर्यादी दाखल करणे, त्यावर सहया करणे, जबाब देणे, व्हेरिफिकेशन करणे, ॲफिडेव्हीट देणे व त्या संदर्भातील सर्व ती कायदेशीर कामे करणेबाबत फिर्यादी संस्थेचे मा. संचालक मंडळाने ठराव करुन श्री. सागर लक्ष्मण फुलारी यांना अधिकार दिलेले आहेत. तसा ठराव असुन त्याची प्रत सोबत दाखल केलेली आहे व त्या अधिकारात फिर्यादी संस्थेकरीता सदरची फिर्याद आणलेली आहे.

२. फिर्यादी संस्थेच्या वतीने तिचे सभासदांना तसेच नाममात्र सभासदांना उद्योग धंद्यासाठी, घर बांधकामासाठी, बचत गटासाठी, वाहन खरेदी तसेच इतर घरगुती कारणांसाठी कर्ज पुरवठा केला जातो. तसेच ठेवी गोळा करुन बँकींगचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला होता.

३. आरोपी हे फिर्यादी संस्थचे सभासद आहेत. आरोपी यांनी फिर्यादी संस्थेकडून **टेलरिंग साठी** कर्जावू रक्कम मिळावी म्हणून कर्जाची मागणी केलेली होती. त्यानुसार आरोपीची कर्जाची मागणी मंजुर करुन आरोपीस रक्कम **रुपये ५०,०००/-** चे कर्ज मंजुर करुन कर्ज प्रकरणातील अटी व शर्तीवर **ता. १२/०६/२०२३** रोजी अदा करण्यात आलेले आहे. सदर कर्जाची फेड आरोपीने त्यावरील होणाऱ्या व्याजासही ठरावीक मुदतीत करण्याचे मान्य व कबुल केलेले होते. मात्र आरोपीने कबुल केल्याप्रमाणे सदर रकमेची फेड न करता कर्जाची बाकी थकविलेली आहे. अनेकवेळा मागणी करुनही

रक्कम देवू दिलावू करुन दिली नाही व रक्कम देण्याचे कामी टाळाटाळ केलेली आहे.

४. शेवटी आरोपीस थकबाकी रकमेची मागणी करता आरोपीने फिर्यादी संस्थेच्या कार्यालयात येवून आरोपीकडे असलेल्या थकबाकी रक्कम तसेच त्यावरील येणे असलेल्या व्याजाचा हिशोब करुन आरोपी यांनी त्यांचेकडे असणाऱ्या थकीत रकमेपोटी आरोपीने त्याचे खाते असलेले **एच डी एफ सी बँक, शाखा – सोनई, अहमदनगर** या बँकेचा **चेक नं. ०००००१** रक्कम **रुपये ४४,८००/-** चा **ता. ०६/०१/२०२५** रोजीचा दिला व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर निश्चित वटेल असा खात्री व भरवसा दिलेवरुन, आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून सदरचा चेक स्विकारला. सदरचा चेक फिर्यादी यांनी त्यांचे खाते असलेल्या **श्री वारणा सह. बँक ली., शाखा – अहमदनगर** या बँकेत **ता. ०८/०१/२०२५** रोजी भरला असता सदरचा चेक आरोपीचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने आरोपीचे बँकेने **"फंड्स इनसफीशीएंट"** असा शेरा मारून **ता. ०९/०१/२०२५** रोजी परत पाठविला व तशी इंटीमिशन फिर्यादीस त्यांचे बँकेने देवून, त्यासोबत सदरचा चेक न वटता मेमोसहीत परत केलेला आहे.

५. सदरचा चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने आरोपीस वकीलामार्फत ता.**२७/०१/२०२५** रोजी नोटीस पाठवून चेक डिसऑनर झाल्याबाबत कळविले व चेकच्या रकमेची मागणी केली असता सदरची नोटीस आरोपी यांनी **दिनांक** ०५ **/०२/२०२५** रोजी स्विकारली. मात्र नोटीस मिळूनही आरोपी यांनी फिर्यादीस मुदतीत चेकची रक्कम आणून दिली नाही.

अशाप्रकारे आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही याची माहिती व कल्पना आरोपीस असतांना देखील आरोपीने जाणीवपूर्वक सदरचा खोटा चेक देवून फिर्यादीची फसवणूक केलेली आहे व निगोशिएबल इन्स्टूमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार गंभीर स्वरुपाचा

फौजदारी गुन्हा केलेला आहे म्हणून फिर्यादीची आरोपी विरुद्ध निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार सदरची फिर्याद आहे.

**तरी फिर्यादीची विनंती की.**

आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन तसेच दंड करण्यात यावा व दंडाच्या रकमेतून फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा, ही विनंती.

**याकामी फिर्यादीतर्फे तुर्त साक्षी पुरावा खालीलप्रमाणे**

१. **मा. शाखाधिकारी, एच डी एफ सी बँक, शाखा – सोनई, अहमदनगर**

साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येतांना आरोपीचे खात्याबाबत तसेच आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेवून साक्षीस हजर रहावे.

२. **मा. शाखाधिकारी, श्री वारणा सह. बँक ली., शाखा – अहमदनगर**

साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येतांना आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्यासंदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेवून साक्षीस हजर रहावे.

येणेप्रमाणे फिर्यादीतर्फे तुर्त साक्षीपुरावा असे. जादा पुरावा लागल्यास तो देण्याची फिर्यादी परवानगी असावी.

येणे प्रमाणे फिर्यादी यांची फिर्याद असे.

**अहमदनगर**

**दिनांक-** १६ **/०३/२०२५** **ॲडव्होकेट** **फिर्यादी**

**S.C.C.No.3440/2025**
**Mangaldip Multistate Urban Co.Operative Credit Society Ltd., Ahmednagar**
**Vs**
**Bhimabai Subhash Wakchaure**

## ORDER BELOW EXH.1

Read the complaint. Heard the learned counsel for the complainant. By virtue of Section 4(2) of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023, being special Act, the procedure prescribed under Section 142 of The Negotiable Instruments Act, 1881 i.e. taking cognizance of such offence on affidavit is applicable and not the proviso of Section 223(1) of The B.N.S.S., 2023 i.e. opportunity of hearing to the accused be given before taking the cognizance of offence. The complainant has submitted the affidavit. Perused the affidavit and documents on record. From the record, prima facie sufficient grounds appears for proceeding against the accused for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881. Resultantly, the following order :

## O R D E R

1. Issue process against the accused under Section 227 of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881.

2. Issue summons to the accused in regular mode as well as by R.P.A.D.

3. Hamdast be given to the complainant for service of summons, if required.

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
DN: cn=MAYA ABHIJEET DESHMUKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6953363, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN

( **Maya A. Deshmukh** )
Addl. Chief Judicial Magistrate,
(Court No.06) Ahmednagar

Date : 11.04.2025